# ह्युएनत्संग

सर्वांगीण जीवनाचा अभ्यास करण्यासाठी हे बुद्धिवंत भारतात आले. या बुद्धिवतामध्ये मुकुटमणी शोभावा असा एक बुद्धिवंत होता. हा बुद्धिवंत म्हणजे सुप्रसिद्ध चिन यात्रेकरू ह्युएनत्संग त्याने भारतातून चीनमध्ये परत गेल्यावर भारताविषयी जे लिहून ठेवले त्यावरून हर्षाचा इतिहास समजण्यास मदत होते. ह्युएनत्संगच्या लिखाणाअभावी आपण हर्षाच्या जीवनातील अनेक प्रसंगांना मुकलो असतो. यात्रेकरूमधील राजकुमार, धर्माचा गाढा अभ्यासक, वर्तमान शाक्यमुनी इ. निरनिराळ्या विशेषणांनी गौरविल्या गेलेल्या ह्युएनत्संगचा जन्म इ. स. ६०५ मध्ये चीनमधील प्रांतात झाला. त्याच्या वडिलांचे नाव होई हे होते. तीव्र बुद्धिमत्ता आणि धर्माकडे ओढा असल्याने त्याला बौद्ध मठात शिक्षणासाठी पाठविण्यात आले वयाच्या १३ व्या वर्षी तो बौद्ध भिक्षु बनला आणि साऱ्या चीनमध्ये त्याची कीर्ती पसरली ह्युएनत्संग लहान असताना चीनमध्ये एक क्रांती घडून आली ज्यात हजारो बौद्ध भिक्षु मारले गेले. या बौद्ध भिक्षुत हुएनत्संगचे आई-वडीलही होते. बौद्ध मठात शिकत असताना ह्युएनत्संगने अनेक बौद्ध ग्रंथांचा अभ्यास केला. क्रांतीची आग शमल्यानंतर ह्युएनत्संगने संपूर्ण चीनभर प्रवास केला. या प्रवासात त्याला जे अनुभव आले त्यातून त्याच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या या शंकांचे निरसन करवून घेण्यासाठी तसेच बौद्ध साहित्य व धर्माचा सखोल अभ्यास करण्यासाठी आणि बुद्धाच्या जन्म व कर्मभूमीला भेट देण्यासाठी त्याने भारतात येण्याचे ठरविले. त्याच्या या भारतभेटीला चिनी शासनाने सर्वतोपरी साहाय्य करावे ही ह्युएनत्संगची अपेक्षा होती. परंतु चिनी शासनाने त्याचा पार अपेक्षाभंग केला. एवढेच नव्हे तर त्याला भारतभेटीची परवानगीही नाकारली शेवटी मोठ्या प्रयत्नानंतर चिनी शासनाचे मन वळविण्यात तो यशस्वी ठरला व मोठ्या मुष्कीलीने भारतात पोहोचला.

ह्युएनत्संगने भारतातील काश्मीर, पंजाब, मथुरा, कनौज, प्रयाग, कौशांबी, सारनाथ आणि इतर महत्त्वाच्या बौद्ध तीर्थक्षेत्रांना व मोठ्या शहरांना भेटी दिल्या. लुम्बिनी, बोधगया, सारनाथ, नालंदा इ. ठिकाणी त्याने दीर्घकाळ वास्तव्य केले. ह्युएनत्संग सम्राट हर्षवर्धनच्या काळात भारतात आला व त्याचे बहुतांश वास्तव्य हर्षाच्या साम्राज्यातच होते. हर्षवर्धन ह्युएनत्संगच्या व्यक्तिमत्त्वाने इतका प्रभावीत झाला की त्याचा जास्तीत जास्त सहवास मिळविण्याचा हर्षाने प्रयत्न केला त्यामुळे ह्युएनत्संगलाही हर्षाच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्याच्या प्रशासनाचे तसेच त्याच्या सर्वांगीण जीवन पद्धतीचे जवळून निरीक्षण करता आले. ह्युएनत्संग जेव्हा चीनला परत गेला तेव्हा त्याने त्याच्या 'तातांगसियुकी' या पुस्तकात हर्षकालीन भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक परिस्थितीचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. काही इतिहासकारांना या पुस्तकात हर्षाच्या अतिशयोक्त स्तुतीचा वास येतो. परंतु ह्युएनत्संग हा काही हर्षचा दरबारी स्तुतिपाठक किंवा भाट नव्हता. शिवाय तो आपणहून हर्षाकडे गेला नव्हता तर हर्षानेच त्याला पाचारण केले होते. मुख्य म्हणजे त्याने जे पुस्तक लिहिले ते चीनला परतल्यानंतर त्यामुळे हर्षाची खोटी स्तुती करणे किवा त्याच्या धाकापोटी त्याला अतिशयोक्त विशेषणे लावण्याची त्याला गरज नव्हती. सुरुवातीची सहा वर्षे त्याने संस्कृत भाषेच्या अभ्यासात घालीवल्याने तो संस्कृत भाषेविषयी अनभिज्ञ होता असेही नाही. १५ वर्षे तो भारतात राहिल्याने भारतीय परंपरा, जीवनपद्धती,संस्कृती त्याचे संधर्भ याविषयी तो परिचित होता.

ह्युएनत्संग हा भारतात इ.स. ६३० ते ६४४ अशी १४ वर्ष भारतात होता. इ.स. ६३१ मध्ये तो चीनहून निघाला आणि इ.स. ६३५ मध्ये काश्मीरला पोहोचला विविध ठिकाणांना भेट देत तो इ.स. ६४० मध्ये दक्षिण भारतातील कांजीवरम (कांची) येथे पोहोचला. त्याचा परतीचा प्रवास अत्यंत कष्टप्रद झाला. या सर्व संकटांवर करीत शेवटी बुद्धाचा सुवर्ण, रजत व चंदनाची १५० स्मरणचिन्हे आणि ६५७ हस्तलिखिते चीनमध्ये नेण्यात तो यशस्वी ठरला. उर्वरित आयुष्य त्याने या हस्तलिखितांचे चिनी भाषेत भाषांतर करण्यात घालविली इ.स. ६६४ मध्ये तो बुद्धवासी झाला.

**हुएनत्संगचे भारत वर्णन**

तातांगसियुकी प्रथात भारताच्या शहराविषयी हो लिहितो की, भारतातील नगर व ग्रामांभोवती भक्कम तटबंदी असे तटबंदीला ठिकठिकाणी प्रवेशद्वारे असत. तटबंदीची भित उंच आणि रुंद असे रस्ते रुंद परंतु गलिच्छ होते. खाटिक, फासेपारधी, मांग, भंगी इ. गावाकुसाबाहेर राहत त्यांना घराबाहेर पडल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूनेच चालावे लागे. ते अत्यंत गलिच्छ वस्त्यांमध्ये राहत त्यांच्या घरांच्या भिती अतिशय कमी उंचीच्या असत.

घरांच्या भितीना चुन्याच्या किंवा गाईच्या शेणमिश्रित मातीचा लेप दिला जाई संघाराम (आश्रम) चे बांधकाम अत्यंत नीटनेटके असे कित्येक संघाराममध्ये तीन मजली स्तंभ असल्याचा उल्लेख ह्युएनत्संग करतो. संघारामच्या दर्शनी भागावर उत्कृष्ट कारागिरी असे दारे, खिडक्या व कमी उंचीच्या बाह्यभितींना आकर्षक रंग दिले जात.

ह्युएनत्संगच्या वर्णनानुसार भारतात अनेक मजली, निरनिराळ्या आकाराचे व सजावटीचे राजवाडे होते. राजप्रासादांची द्वारे पूर्वाभिमुखी असून राजसिहासनेही पूर्वाभिमुखी असत.

भारतीयांचा पोषाख साधा असे. ते शिवलेली वस्त्रे वापरीत नसत. पुरुष कमरेभोवती एक वस्त्र गुंडाळीत व त्याचे एक टोक उजव्या खांद्यावरून घेत. स्त्री व पुरुष वस्त्रे साधी व सामान्यतः पांढऱ्या रंगाची असत.

भारताची समृद्धता पाहून ह्युएनत्संग आश्चर्यचकित झाला होता. त्याच्या कथनानुसार भारतीयांचे राहणीमान अत्यंत उच्च दर्जाचे होते. सुवर्ण व चांदीची नाणी चलनात होती. कोड्यांचाही उपयोग चलनात होत असे. जमीन अत्यंत सुपीक असून शेतीत भरघोस उत्पन्न येई. शेतात निरनिराळी फळे व भाजीपाल्याची लागवड केली गहू, डाळी, साखर, दूध व दुधापासून तयार केलेले पदार्थ प्रामुख्याने लोकांच्या आहारात असत. विशेष कार्यप्रसंगी मांसाहार घेतला जाई. गाय व इतर काही प्राण्यांच्या मांससेवनाता पूर्णपणे बंदी होती. या नियमांचा भंग करणाऱ्यांना कडक शिक्षा केल्या जात

ह्युएनत्संगच्या कथनानुसार यावेळी राजकीय व ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध असले जुन्या शहरांचे महत्त्व कमी होऊन त्यांची जागा नवीन शहरांनी घेतली होती. शेकडो वर्षे केवळ उत्तर भारतातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील महत्त्वाचे राजकीय केंद्र असलेल्य पाटलीपुत्रची जागा कनौज या शहराने घेतली होती. कनौज शहराच्या वैभवाचे वर्णन करताना ह्युएनत्संग लिहितो की हे शहर ५ मैल लांब आणि १ १/४ मैल रुंद असून या शहरात सर्वत्र भव्य इमारती, नयनरम्य बगीचे आणि निर्मळ पाण्याचे तलाव होते. हे शहर म्हणजे जगातील अत्यंत दुर्मिळ आणि आकर्षक वस्तूंचे जणू वस्तुसंग्रहालय होते. या शहरात जागोजागी बौद्ध मठ आणि हिंदूंची मंदिरे होती. या शहरातील नागरिकांच्या मौल्यवान वस्त्रप्रावरणांमधून जशी त्यांची समृद्धी डोकावत होती तशीच त्यांच्या वागण्याबोलण्यातून त्यांची सांस्कृतिक अभिजातता आणि निरनिराळ्या ललित कला व साहित्याविषयीचे प्रेम डोकावत होते.

पाटलीपुत्रप्रमाणेच श्रावस्ती आणि कपिलवस्तु या जुन्या नगरीचेही महत्त्व लोप पावत होते. श्रावस्तीचे तर केवळ जीर्णशीर्ण अवशेष उरले होते आणि कपिलवस्तू येथे केवळ ३० बौद्ध भिक्षुचे वास्तव्य होते. नालंदा आणि वल्लभी ही बौद्ध धर्माच महत्त्वाची केंद्रे होती.

ह्युएनत्संगच्या वर्णनावरून हर्षाच्या काळात भारतात वस्त्रे विणण्याची कला उत्कर्षाच्य चरमबिंदूला पोहोचली होती. ह्युएनत्संग चार प्रकारच्या वस्त्रांचा उल्लेख करतो. 'कौसीय हे वस्त्र रेशीम व कापसापासून तयार केले जाई 'क्षोम' या वस्त्रासाठी तीन प्रकारच्या झाडांच्या तंतूंचा उपयोग करण्यात येई. 'कांबळी' हे एक प्रकारच्या घोंगडीसारखे व होते. वस्त्राचा चौथा प्रकार म्हणजे प्राण्यांच्या लोकरीपासून बनविण्यात आलेले अत्यंत तलम व नरम वस्त्र.

हर्षकालीन औद्योगिक जीवन हे जातीव्यवस्थेवर आधारित असून त्याला व्यावसायिक श्रेणीकडून नियंत्रित केले जाई. तत्कालीन समाजरचना ही जातीव्यवस्थेवर आधारित होती. ब्राह्मण हे धार्मिक कर्तव्य पार पाडीत. क्षत्रीय हा शासक वर्ग होता. वैश्य हे शेती व व्यापार करीत तर शूद्र हे शेती व मोलमजुरी करीत. ब्राह्मण व क्षत्रियांची राहणी अत्यंत स्वच्छ व निटनेटकी होती. भोजनापूर्वी ते स्नान करीत. प्रत्येक भोजनाच्या वेळी ते ताजे शिजवलेले अन्न सेवन करीत. भोजनानंतर झाडाच्या काडीने दात स्वच्छ करीत.

भारतीयांविषयी लिहिताना ह्युएनत्संग म्हणतो की ते पापभिरू, प्रामाणिक, मृदू स्वभावाचे आणि धर्मानुसार आचरण करणारे असत. वचनांचे पक्के होते. भारतीय विवाहसंस्थेविषयी तो म्हणतो की विवाह हे जातीतच होत. सगोत्र विवाह होत नसत. निरनिराळ्या जातींची स्वतःची विवाहाची व भोजनाची वैशिष्ट्ये होती. परंतु त्यामुळे सामाजिक एकतेला तडा जात नसे. उलट निरनिराळ्या जाती निरनिराळ्या सामाजिक, धार्मिक प्रसंगांत गुण्यागोविंदाने भाग घेत.

ह्युएनत्संग भारतीयांच्या सात्विक आहाराची प्रशंसा करताना म्हणतो की काही तुरळक अपवाद सोडले तर भारतीयांच्या आहारात कांदा व लसूण हे पदार्थ वर्ज्य होते. समाजात विधवाविवाह नव्हता. उच्चवर्णीय स्त्रियांमध्ये पडदा पद्धती नव्हती. ह्युएनत्संगच्या धार्मिक प्रवचनांना राज्यश्री पडदा न वापरता उपस्थित राहत असे. सतीप्रथा प्रचलीत येती. प्रभाकरवर्धनची पत्नी यशोमती पतीच्या मृत्यूनंतर सती गेली होती. राज्यश्रीही सती जाण्याच्या बेतात असतानाच हर्षवर्धनने तिला सती जाण्यापासून परावृत्त केले होते.

शिक्षणात धार्मिक गोष्टींवर जास्त भर दिला जाई. बौद्ध विहार व मठ ही बौद्ध धर्माच्या शिक्षणाची केंद्रे होती. वैदिक शिक्षणपद्धतीत मौखिक पद्धतीवर विशेष भर दिला जाई. बाह्मी लिपी प्रचारात होती व ती बह्माने निर्माण केली अशी तत्कालीन समाजाची श्रद्धा होती. उच्चवर्णीय व विद्वानांची भाषा संस्कृत होती. शिक्षणाचा काळ हा ९ ते ३० वर्षांच्या दरम्यान असे. कित्येक लोक स्वतःचे संपूर्ण आयुष्य शिक्षणासाठीच अर्पण करीत. तो नालंदा विद्यापीठातील शिक्षणाविषयी सविस्तर माहिती देतो.

प्रशासनाविषयी ह्युएनत्संग लिहितो की, त्यासाठी काही निश्चित तत्त्वे असून त्यांचे कसोशीने पालन केले जाई. प्रशासनात व्यक्तिस्वातंत्र्याला प्रचंड वाव होता. सरकारी जमिनीच्या मालकीचे चार भाग करण्यात आले असून पहिल्या भागातून राज्याचा खर्च,

दुसऱ्या भागातून सरकारी अधिकाऱ्यांचा पगार, तिसऱ्या भागातून विद्वानांना प्रोत्साहनपर देणग्या तर चौथ्या भागाच्या जमिनीच्या उत्पन्नातून धार्मिक संस्थांना अनुदान दिले जाई. यामुळे प्रजेवर कराचा विशेष भार पडत नसे. हर्षाच्या काळात कर सुसा होते. व्यापाऱ्यांना अल्पदरात राजरस्ते व नद्यांचा व्यापारासाठी उपयोग करता येई

सार्वजनिक हिताच्या कामासाठी मजुरांना कामाच्या प्रमाणात मोबदला दिला जाई एनत्संग लिहितो की भारतीय मनुष्य हा पापभिरू असून तो नीती व कायद्यानुसार वागणारा आहे. त्यामुळे गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते. गुन्हेगारांना कडक शिक्षा दिल्या जात व ते केवळ मरणाची वाट पाहत जगत.

हर्षवर्धन त्याच्या साम्राज्यात सतत दौरे काढीत असे त्यामुळे त्याला प्रजेच्या अडीअडचणी समजून घेणे व त्या दूर करणे शक्य होई. हर्षाच्या दैनंदिन कामकाजाविषयी ह्युएनत्संग लिहितो हर्षाने स्वतःच्या दैनदि कामकाजाच्या तासांचे तीन भागांत वर्गीकरण केले होते. पैकी एक भाग तो प्रशासनीय कामकाजात व दोन भाग धार्मिक कार्यात खर्च करीत असे. या कामात तो इतका मग्न होऊन जाई की त्याला जेवण व झोपेचीही शुद्ध नसे. राजदरबारात होणार दैनंदिन कामकाजाची विस्तृत नोंद ठेवली जात असे.

ह्युएनत्संगच्या कथनानुसार हर्षाचे सैन्य विशाल होते. त्याच्या सैन्यात ५०,०००। पायदळ, १,००,००० घोडदळ आणि ६,००० हत्ती होते. रथदळ विभाग सैन्यात नव्हता. युद्धाव्यतिरिक्त सेना साम्राज्याच्या सीमेची सुरक्षा आणि अंतर्गत शांतता टिकविणे ही कामे पाहत असे. सैन्याचे निरनिराळे विभाग असून त्यांची कामे ठरलेली होती सैन्याला नियमित व निश्चित पगार मिळे.

अशा रीतीने ह्युएनत्संगच्या भारतभेटीवर आधारित तातागसियुकी या ग्रंथावरून हर्षवर्धन व तत्कालीन भारताचा सविस्तर इतिहास समजण्यास मदत होते.